CMYK

सुविचार

शहाणपण हे वयावर नाही तर अनुभवावर अवलंबून असते

# दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com



**१७ जूनला भरवणार गटशिक्षणाधिकारी कार्यालयामध्ये शाळा भरवण्याचा इशार**

पेज ४

■ दैनिक ■धाराशिव ■वर्ष 2 रे ■ अंक 125 ■ शनिवार दि.14 जून 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

## ६ महिन्यानंतरही वैद्यकीय महाविद्यालयाला एमआरआय मशीनची प्रतीक्षा

### राजकीय आणि सामाजिक लढा देऊन आणलेली मशीन प्रशासकीय दिरंगाईत अडकली

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्हा शासकीय रुग्णालयात सोयीसुविधांची वानवा असल्यामुळे उपचारापेक्षा रोग बरा अशी अवस्था नागरिकांची झाली आहे. त्यातच एखादी चांगली गोष्ट धाराशिव जिल्ह्यात येत असताना राजकीय कुरघोड्यामुळे किंवा प्रशासकीय दिरंगाईमुळे ती गोष्ट जिल्ह्यात येत नाही. हेच जिल्ह्यात येऊ घातलेल्या एमआरआय मशिनबाबत झाले आहे. धाराशिवची एमआरआय मशीन जानेवारी महिन्यात इचलकरंजी येथे हलवण्याचा डाव सुरू असताना राजकीय आणि सामाजिक स्तरावरून धाराशिव जिल्ह्यातून त्याला प्रचंड विरोध दर्शविला होता. या विरोधानंतर सरकारला तो निर्णय बदलणे भाग पडले होते. परंतु सहा महिने होत आले तरी अजूनही शासकीय रुग्णालयात एमआरआय मशीन दाखल झालेली नाही. प्रशासकीय दिरंगाईमुळे या मशीनला उशीर होत असून, या विषयात राजकीय नेत्यांनी लक्ष देण्याची गरज आहे.







धाराशिव जिल्ह्यात मेडिकल कॉलेज सुरू होऊन तीन वर्षे झाली तरी मेडिकल कॉलेजच्या रुग्णालयात अजूनही एमआरआय सुविधा सुरू करण्यात आलेली नाही. जानेवारी महिन्यात धाराशिव साठी एमआरआय मशीन मंजूर करण्यात आली होती. परंतु, जागेअभावी हे मशीन कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथे हलवण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. तसेच, तुळजापूर उपजिल्हा रुग्णालयासाठी मंजूर झालेल्या सिटी स्कॅन मशीनलाही जागा नसल्याचे कारण देत लोणावळा येथे हलवण्यात आले होते. परंतु, जिल्ह्यातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील नागरिकांनी याला तीव्र विरोध केल्यानंतर शासनाला हा निर्णय बदलावा लागला होता. धाराशिवची एमआरआय मशीन धाराशिव जिल्ह्यालाच मिळेल असा निर्णय शासनाने घेतल्यानंतर ही मशीन नेमकी कधी दाखल होते याची जिल्ह्याला प्रतीक्षा लागलेली आहे. परंतु, सहा महिने झाले तरी एमआरआय मशीन अजूनही मिळू शकली नाही. प्रशासकीय दिरंगाईमुळे मशीन मिळण्यात अडचणी येत असल्याचे सम जते. वैद्यकीय महाविद्यालयात दाखल होणाऱ्या रुग्णांची गैरसोय टाळण्यासाठी अवघ्या एक महिन्यात एमआरआय मशिन बसवण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून फेब्रुवारी महिन्यात सांगण्यात आले होते. कंपनीने स्थळ पाहणी केल्याचेही त्यावेळी सांगितले होते. परंतु, त्यानंतर काहीच हालचाली झाल्या नाहीत. एमआरआय मशीन दाखल होऊन बसविण्यास बराच वेळ लागणार आहे. एमआरआय मशीन मंजूर झाली असली तरी या मशीनसाठी जागेची अडचण होती. सध्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील क्रिटिकल केअर सेंटरच्या बाजूला २००० स्क्वेअर फूट जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याठिकाणी बांधकाम सुरू असून, विद्युत आणि इतर कामेदेखील सुरू असल्याचे दिसते. परंतु, मशीन दाखल होऊन रुग्णांना सेवा मिळण्यास आणखी किती कालावधी लागेल हे अजूनही निश्चितपणे सांगता येत नाही. एम आरआय बसवण्यासाठी संबंधित कंपनीने जागेची प्राथमिक स्वरूपात पाहणी केली आहे. त्याप्रमाणे वरिष्ठांना अहवाल सादर केला आहे. अहवालानंतर एमआरआय मशिन बसवण्यासाठी संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी फेब्रुवारीत महिन्यात वैद्यकीय महाविद्यालयाला भेट दिली होती. मशिन बसवण्यासाठी सर्व प्रक्रिया करण्यासाठी एक महिन्याचा कालावधी कंपनीने मागितला होता. परंतु, चार महिने झाले तरीही मशीन संदर्भात काहीच हालचाली दिसून येत नाहीत. जिल्ह्यातील आरोग्य विभागाकडे एकही एम आरआय मशिन नसल्याने रुग्णांना खासगी केंद्रातून तब्बल सहा हजार रूपये देऊन एमआरआय काढावा लागतो. या त्रासापासून मुक्ती मिळावी यासाठी राजकीय नेत्यांनी देखील या विषयात लक्ष घालण्याची मागणी होत आहे.

#### दोन महिन्यात एमआरआय सेवा सुरू होईल

एमआरआय आणण्यासाठी प्रशासकीय पातळीवरील नव्वद टक्के प्रक्रिया पूर्ण झाली आहे. एमआरआय साठी दोन हजार स्क्वेअर फूट जागा उपलब्ध करून दिली आहे. त्याचे बांधकाम आणि विद्युतचे काम देखील अंतिम टप्प्यात आलेले आहे. पुढील दोन ते अडीच महिन्यात एमआरआय ची सेवा सुरू होईल.

डॉ. धनंजय चाकूरकर
जिल्हा शल्य चिकित्सक, धाराशिव.

## अडवलेला शेतरस्ता महसूल विभागाने केला खुला



आरंभ मराठी | येरमाळा

रत्नापूर ( ता.वाशी ) गावठाण ते पानगाव हा पूर्वापार चालत आलेला नकाशातील रस्ता ग.नं. २३ मधील वीस वर्षांपासूनचा अतिक्रमित शेतकऱ्यांनी अडवलेला रस्ता महसूल विभागाने खुला केला. रत्नापूर येथील रत्नापूर ते पानगाव गावठाण शेतरस्ता खुला करून दिला. वाशी तालुक्यातील रत्नापूर येथील शेतकरी चंद्रकांत विश्वनाथ टेकाळे व इतर शेतकरी यांच्या अर्जाच्या अनुषंगाने रत्नापूर येथील अतिक्रमित शेतकरी यांना तक्रारी संदर्भान्वये पत्रानुसार नोटीसा देऊन महसूल विभागाच्या आदेशानुसार भूमीअभिलेख विभागाचे मोजणीदार यांच्यामार्फत गाव नकाशावरील रस्ता खुला करण्याची कार्यवाही करण्यात आली. परस्पर तक्रारदार आणि अतिक्रमित शेतकरी यांच्या शेत रस्ता खुला करण्याबाबत झालेल्या सामंजस चर्चेतून खुला करण्यास सकारात्मकता दर्शवली होती. यासाठी येरमाळा महसूल मंडळ अधिकारी नागटिळक यांनी तहसीलदार हेमंत ढोकले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न केले होते.शेतारस्त्याचा संबंधित शेतकरी,तक्रार दार,अतिक्रमित शेतकरी यांना आवश्यक कागदोपत्री पुरावे घेऊन हजर राहणे,शेत रस्ता खुला करण्यासाठी लागणारी यंत्र, ट्रॅक्टर,जेसीबी द्वारे पोलिसांच्या बंदोबस्तात रत्नापूर पानगाव रस्ता खुला करण्यात आला.यावेळी महसूल मंडळ अधिकारी नारायण नागटिळक,तलाठी मंगेश नागरे, तंटामुक्ती अध्यक्ष रमेश जाधवर, सरपंच सुनील वाघमारे,पोलीस पाटील सुसेन जाधवर, मोजणीदार ओगले,इतर शेतकरी पोहेकॉ सांडसे,संतोष तिघाडे, महसूल सेवक संजय पवार,उपस्थित होते. शेतरस्त्यासाठी शेतकऱ्यांनी समत्ती दिली असुन सध्या रस्त्याचे मोजमाप करून रस्ता आखण्याचे काम पूर्ण झाले आहे.

## पोलीस असल्याची बतावणी,भामट्याने महिलेचे अडीच तोळे सोने लुटले

आरंभ मराठी | कळंब



पोलीस असल्याचे खोटे सांगून एका भामट्याने एका महिलेचे अडीच तोळे सोने लुटून नेल्याची घटना कळंब शहरात घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, फिर्यादी सविता सुबराव लांडगे (वय ५९ वर्षे, रा. म हेकर कॉलेज बाजूला दत्तनगर, कळंब) या दिनांक १२ जून रोजी कळंब ते येरमाळा रोडवर शासकीय विश्राम गृहाच्या कंपाउंड वॉल जवळून दत्तमंदीर येथे जात होत्या. त्यावेळी तिथे उभ्या असलेल्या एका अनोळखी व्यक्तीने त्यांना आवाज देऊन थांबवले आणि मी पोलीस असून इथे एक खून झाल्याचे खोटे सांगितले. तसेच त्याने पोलीस असल्याचे खोटे ओळखपत्र देखील त्यांना दाखवले. त्याने फिर्यादीना तुमच्या गळ्यातील मंगळसुत्र काढुन ठेवा असे सांगुन आणखी एका अनोळखी ईसमाला बोलावून घेवून तुम्हीपण हातातील अंगठी काढुन खिशामध्ये ठेवा असे सांगितले. सविता लांडगे यांनी गळ्यातील मंगळसूत्र काढून बॅगमध्ये ठेवले असता, भामट्याने तोतयागिरी करुन बॅगेतील २५ ग्रॅम वजनाचे मंगळसुत्र घेऊन पळ काढला. आरोपी २,२०,००० रुपये किंमतीचे मंगळसूत्र घेवून मोटरसायकल घेवून थांबलेल्या दुसऱ्या इसमाच्या म ोटरसायकलवर बसून पळून गेले. सविता लांडगे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे कळंब येथे भा.न्या.सं.कलम ३१९(२), ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## कत्तलीसाठी नेण्यात येणारी ४२ गोवंशीय वासरे ताब्यात

आरंभ मराठी | धाराशिव

कत्तलीच्या उद्देशाने ४२ गोवंशीय जनावरांची वाहतूक करत असताना पोलिसांनी कारवाई करून एका व्यक्तीला वाहनासह ताब्यात घेतले. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी सलम ान असलम सय्यद (वय २७ वर्षे, रा. शहाजी नगर, बारामती रोड, इंदापुर ता. इंदापुर जि. पुणे) याला ११ जून रोजी रात्री अकरा वाजता येडशी टोल नाका येथे पिकअप (एमएच ४२ बी ४२०३) मध्ये गोवंशीय जातीची ४२ जर्शी गायीचे वासरे घेऊन जाताना ताब्यात घेतले. यावेळी त्याच्याकडून एकुण ३३,६०० रुपये किंमतीच्या वाहनासह २,३३,६०० रुपये किंमतीची गोवंशीय वासरे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना धाराशिव ग्रामीण पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५, ५(अ), ५(ब), ९(अ), ११ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह मपोका कलम ११९ सह प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(ड) (इ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## नीती आयोगाच्या बक्षिसातून जिल्ह्यातील ७५ शेतकऱ्यांना सिंचनासाठी शेततळ्यांचे वाटप

### शेतकऱ्यांना एक कोटी ७५ लाखांचे अनुदान

आरंभ मराठी | धाराशिव


नीती आयोगाच्या 'आकांक्षीत जिल्हा उपक्रम ंतर्गत सन २०२१ मध्ये धाराशिव जिल्ह्याला प्राप्त झालेल्या बक्षीस निधीचा उपयोग करत जिल्ह्यातील ७५ शेतकऱ्यांना सिंचनासाठी शेततळ्यांचे वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमासाठी एकूण एक कोटी ७५ लाख रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असून, त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जलसंधारण व पाण्याचा शाश्वत वापर करण्यास मोठी मदत होणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांची निवड करून त्यांना हे शेततळे देण्यात आले असून, त्यामध्ये धाराशिव तालुक्याचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे १४ शेतकऱ्यांना ३२.०२ लाख रुपये इतके आहे. त्यानंतर तुळजापूर तालुक्याला १२ शेतकऱ्यांना २८.६४ लाख, कळंबला ११ शेतकऱ्यांना २६.८९ लाख, उमरग्याला ५ शेतकऱ्यांना २४.६८



लाख, परंड्याला ७ शेतकऱ्यांना २१.३१ लाख, भूमला ९ शेतकऱ्यांना १७.५८ लाख, वाशीला १२ शेतकऱ्यांना १२.४६ लाख व लोहाऱ्याला ५ शेतकऱ्यांना ११.४१ लाख रुपयांचे शेततळे वाटप करण्यात आले आहे.या शेततळ्यांमुळे पावसाळ्याच्या पाण्याचा साठा करून शेतकऱ्यांना वर्षभर सिंचनाची सुविधा मिळणार आहे. विशेषतः उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई व पिकांची हानी या समस्यांना यामुळे आळा बसेल. शासनाच्या 'हर घर जल', 'वॉटर फॉर ऑल' आणि 'जलयुक्त शिवार' यांसारख्या अभियानांना हातभार लावणारी ही योजना असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीतही याचा सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी जिल्हा प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने शेतकऱ्यांची निवड केली असून, भूजल सर्वेक्षण आणि उपलब्ध क्षेत्राच्या आधारे ही शेततळ्यांची रचना करण्यात आली आहे. यामुळे पाण्याचा अपव्यय टाळून शाश्वत शेतीस चालना मिळणार आहे. जिल्हाधिकारी, कृषी विभाग व जलसंधारण विभागाच्या समन्वयातून या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत असून, भविष्यात याच धर्तीवर अधिक शेतकऱ्यांना लाभ देण्याचा मानस आहे. नीती आयोगाच्या माध्यमातून मिळालेल्या निधीचा हा वापर जिल्ह्याच्या शाश्वत विकासासाठी एक सकारात्मक पाऊल ठरतोय. शेतकरी बांधवांनी याचा अधिकाधिक लाभ घ्यावा आणि पाण्याचा जपून व प्रभावी वापर करून समृद्ध शेतीकडे वाटचाल करावी,असे आवाहनही जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## स्व.मारुती इटळकरच्या न्यायासाठी वडार समाज रस्त्यावर,प्रचंड आक्रोश मोर्चा

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोरच समाज बांधवांचा ठिय्या; तासभर वाहतूक कोंडी







आरंभ मराठी | धाराशिव

एक महिन्यापूर्वी हाणामारीमध्ये मृत्यू झालेल्या मारुती इटाळकर या तरुणाच्या मृत्यू प्रकरणी न्याय मिळावा या मागणीसाठी वडार एकता परिषदेमार्फत शुक्रवारी (दि.१३) जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी वडार समाजाच्या बहुसंख्य महिला व पुरुषांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोरील रोडवरच ठिय्या मांडल्यामुळे मुख्य रस्त्यावर तासभर प्रचंड मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. आक्रोश मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाल्यामुळे यावेळी वक्त्यांनी आक्रमक भाषणे करत मारुतीला न्याय मिळवून देण्याची मागणी प्रशासनाकडे केली. या प्रकरणाला एक महिना झाला तरी यातील प्रमुख आरोपींना पोलिसांनी अजूनही अटक केली नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. मारुतीच्या बहिणीची छेड काढली म्हणून मारुतीने छेड काढणाऱ्या मुलाला जाब विचारल्याच्या कारणामुळे दिनांक ८ मे रोजी मारुतीला बेदम मारहाण करण्यात आली होती. गंभीर जखमी झालेल्या मारुतीला अगोदर धाराशिव येथील रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. मात्र त्याची तब्येत खालावत गेल्यामुळे त्याला सोलापूरला हलवण्यात आले होते. मात्र १० मे रोजी त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. याप्रकरणी आरोपींना अटक करावी या मागणीसाठी पोलीस अधीक्षक कार्यालयातच मारुतीचे प्रेत आणण्यात आले होते. पोलिसांनी यातील चार आरोपींना अटक केली असून, आणखी दोन आरोपी फरार असल्याचा पीडित कुटुंबाचा आरोप आहे. पोलिसांनी तपासात हलगर्जीपणा केला असून, आरोपींना पाठीशी घातले आहे त्यामुळे यातील जबाबदार पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. मारुतीचा मृत्यू झाल्यावर पोलिसांनी दुसऱ्याच दिवशी मारुतीच्या वडिलांवर गुन्हा दाखल करून असंवेदनशीलता दाखवल्यामुळे यावेळी पोलिसांचा निषेध करण्यात आला. यातील आरोपींना तात्काळ फाशी द्यावी, आरोपींचे सिडीआर तपासावे, वेळेत उपचार न करणाऱ्या केके हॉस्पिटल, धाराशिव सिव्हिल हॉस्पिटल आणि सोलापूर येथील गंगामाई हॉस्पिटलवर कारवाई करावी, मारुतीच्या कुटुंबाला २५ लाखांची आर्थिक मदत द्यावी, मारुतीच्या बहिणींच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने घ्यावी तसेच आरोपींवर पोक्सो अंतर्गत स्वतंत्र गुन्हा दाखल करावा अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. या मागण्यांची दखल घेऊन लवकर न्याय न दिल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

## बांधकाम करू देण्यासाठी ३० लाखांची खंडणी मागितली; दोघांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | येरमाळा

बांधकाम करू देण्यासाठी तब्बल ३० लाख रुपयांची खंडणी मागून कामगारांना धमकवणाऱ्या दोन व्यक्तींविरुद्ध येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी ज्ञानेश्वर दत्तात्रय बारकुल आणि अविनाश ज्ञानेश्वर बारकुल (दोघे रा. येरमाळा ता. कळंब) यांनी दिनांक ११ मे २०२५ ते ११ जून २०२५ या काळात येरमाळा येथे फिर्यादी रत्नमाला मारुती घोळवे, (वय ४३ वर्षे, रा. भगवान बाबानगर, एम.आय.डी.सी. धाराशिव) यांना बांधकाम करु देण्यासाठी ३०,००,००० रुपयांची खंडणीच्या स्वरुपात मागणी करून फिर्यादीच्या सुरु असलेल्या बांधकामावर येवून लोखंडी रॉड घेवून बांधकामावरील कामगारांना शिवीगाळ केली. तसेच काम बंद कर असे म्हणून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी फिर्यादी रत्नमाला घोळवे यांनी दिनांक १२ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम ३०८(३), ३५२, ३५१(२) (३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## ५५० कट्टे सोयाबीन खरेदी करून शेतकऱ्यांची १३ लाखांची फसवणूक

आरंभ मराठी | येरमाळा

शेतकऱ्यांकडून सहा महिन्यांपूर्वी तब्बल ५५० कट्टे सोयाबीन खरेदी करून त्यांचे पैसे न देता तब्बल १३ लाखांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोघांविरुद्ध येरमाळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविस्तर वृत्त असे की,आरोपी संदीप भाउराव मोरे (रा. बार्शी) आणि मन्नत रामलिंग तोडकरी (रा. बार्शी) या दोघांनी दिनांक २८ डिसेंबर २०२४ ते २० जानेवारी २०२५ या काळात वाशी तालुक्यातील सोनारवाडी येथे फिर्यादी नारायण वैजीनाथ घोळवे (वय ६८ वर्षे, रा.सोनारवाडी) यांचे आणि त्यांच्यासोबत इतर शेतकऱ्यांकडून ५५२ कट्टे सोयाबीन खरेदी केले होते. परंतु, आरोपींनी खरेदी केलेल्या सोयाबीनचे १३ लाख २७ हजार ८६३ रुपये थोड्या दिवसाने देतो असे सांगून शेतकऱ्यांची आर्थिक फसवणूक केली. याप्रकरणी नारायण घोळवे यांनी दिनांक १२ जून रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम ३१८(४), ३१६(२),३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

CMYK

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय

शनिवार दि.14 जून 2025

# तळहाताचा पाळणा करून सांभाळते ती आपल्याला, आपल्या आयुष्यात आनंदाचा नेहमीच खुलवते ती मळा

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना सादर नमस्कार. आजचे काव्यारंभचे एकोणिसावे पुष्प मी अक्षरवेल साहित्य मंडळाच्या सदस्य कवयि अलका बाळासाहेब तावडे यांच्या निवडक कविता घेऊन गुंफणार आहे.

कवयित्री अलका तावडे या गृहिणी आहेत, त्या आजपर्यंत कधीही घराबाहेर पडलेल्या नाहीत पण घरामध्येच जेव्हा लिहावं वाटेल, सुचेल तेव्हा त्या
आपले लिखाण घरीच वहीत लिहून ठेवत असत. नंतर त्या अक्षरवेल मंडळाच्या सदस्य झाल्या आणि त्यांच्या सुंदर, अर्थगर्भ काव्यलेखनाबद्दल इतरांना माहिती मिळाली. अक्षरवेलच्या दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या अंकुर या दिवाळी अंकामध्ये त्या लेखन करू लागल्या. अक्षरवेलच्या चारोळी लेखन, कथालेखन कार्यशाळा, संमेलने यात सहभाग देऊ लागल्या. जीवन अधिक रसिकतेने जगु लागल्या. एक गृहिणी पण मनात आणलं तर
आपला छंद जोपासू शकते, हे त्यांनी सिद्ध केलं! त्यांच्या कवितांमध्ये त्यांनी वेगवेगळे विषय हाताळले आहेत आपल्या
जीवन या कवितेत त्या म्हणतात,
जीवन उंच आभाळ आहे, बघावी भरारी मारून
पंखात किती बळ आहे, हे भरारीवर येईल कळून!
तर नशीब कवितेत त्या म्हणतात,
आयुष्यात नको होऊ निराश
खरंच इतकं ते कठीण नाही
हे दिवस ही बदलून जातील
स्थिर असे जगात काहीच नाही!
या दोन्ही कवितांमधून त्यांचा आशावाद व जीवनाबद्दलचा व्यापक दृष्टीकोन दिसून येतो.
हाच दृष्टीकोन त्यांच्या
जगता आलं पाहिजे
या कवितेतही दिसून येतो
त्या लिहितात,
मरता केव्हाही येतं पण जगता आलं पाहिजे
सुख केव्हाही भोगता येते
पण दुःख पचवता आले पाहिजे
आपली मुलं, संसार, गृहिणीची कर्तव्य सांभाळत कविता लिहीत असता कवितेचा छंद जोपासत असताना त्या आपल्या आईबद्दल कविता लिहिताना खूप हळव्या होतात व लिहितात की
आयुष्यातलं आई नावाचं पान
काहीही झालं तरी कधीच मिटत नाही
तर आपल्या सख्याच्या आठवणीची कविता लिहिताना हळव्या होऊन म्हणतात की क्षणाक्षणाला
तुझ्या आठवणी
माझ्या अस्तित्वाची मलाही जाण नाही.
तर अशा या आशयगर्भ कवितांचा आपणआस्वादघेऊया.



डॉ. रेखा अनिल ढगे

काव्यारंभ

## तुझ्या आठवणीत मी...

तुझ्यात इतकी गुंतले मी
सावरण्याची इच्छाच नाही

क्षणाक्षणाला तुझ्या आठवणी
अस्तित्वाची माझ्या मलाही
जाण नाही

रोजच तुझ्यात गुंफते मी
का पण काही कळत नाही

समजवणारे तर समजून थकले
मलाच बहुतेक ते कळून घ्यायचे
नाही

तू तर तसा खुशीत असशील
मी माझी आनंदी आहे

दररोज मनात सलते सारखी
ती कमी फक्त तुझी आहे

## जगता आलं पाहिजे

मरता केव्हा येत.
पण जगता आलं पाहिजे.
सुख भोगता केव्हाही येत.
पण दुःख पचवता आलं पाहिजे.
रंग सावळा म्हणून काय झालं.
कर्तव्य उजळता आलं पाहिजे.
रंग गोरा असला म्हणून काय
झालं
मनावरची काजळी काढता
आली पाहिजे.
यशाने माणूस उंच जातो.
पाय जमिनीवर ठेवता आले
पाहिजे.
मिळालेल्या यशात समाधान
मानून .
आनंदी जीवन जगता आलं
पाहिजे.
पाप काय कसे करता येतं.
पण पुण्य करता आलं पाहिजे.
ताट काय कुणीही राहतं .
पण जरा झुकून वागता आलं
पाहिजे.
ठेच जीवनात लागते
सहन करता आली पाहिजे..
मलमपट्टी करून तिला.
पुन्हा चालता आलं पाहिजे.
शहाण्याचं सोंग घेऊन.
वेड होता आलं पाहिजे.
कशाला बळी पडता.
आनंदी जगता आलं पाहिजे.
जगण्याच्या लढाईत उनीव
कायम. भासेल.
ती उणीव भरता आली पाहिजे.

## जीवन

जीवन म्हणजे एकदा घ्यावे
जाणून
जीवनामध्ये एकदा पाहावे मागे
वळून
जीवन एक लढाई आहे बघायला
हवी लढून.
जय झाला की पराजय हे
लढल्यावर येईल कळून.
जीवन एक सागर आहे बघायला
हवा पोहून.
बुडलो की तरलो हे पोहल्यावर
येईल कळून.
जीवन एक यज्ञ आहे बघायला
हव जळून.
राख होईल की जाऊ पोळून हे
जळल्यावर येईल कळून.
जीवन एक तप आहे त्याग
पहावा करून.
काय मिळवलं काय गमावलं हे
त्यागावरच येईल कळून.
जीवन उंच आभाळ आहे बघावी
भरारी मारून.
पंखात किती बळ आहे हे
भरारीवर येईल कळून.
जीवन एक गीत आहे बघायला
हव गाऊन.
सूर जुळतात की बेसूर हे गीत
गायल्यावर येईल कळून.
जीवन एक स्वप्न आहे बघावं
डोळे उघडे ठेवून.
स्वप्नपूर्ती होते की आपूर्ति हे
स्वप्न पाहिल्यावर येईल कळून.
चांगलं वाईट काहीतरी होणारच
हे कृतीवर असत अवलंबून.
जगताना मात्र आपण कसे
जगलो याचा पहावा विचार
करून.

## आई

जगण्याच्या धडपडीत.
घर सुटतं पण..
आठवणी कधी सुटत नाहीत.
आयुष्यातलं आई नावाच पान..
काहीही झालं तरी कधीच
मिटत नाही
तळहाताचा पाळणा करून
सांभाळते ते आपल्याला..
आपल्या आयुष्यात आनंदाचा
नेहमीच खुलवते ती मळा
आपण जरी विसरलो..
तरी माया तिची कधी भेटत
नाही
आयुष्यातलं आई नावाच पान..
काहीही झालं तरी कधीच
मिटत नाही
तिच्या अखेरच्या श्वासापर्यंत..
आपलाच लळा असतो..
आपलं भलं व्हावं..
यातच तिचा जगण्याचा सोहळा
असतो..
तुझ्या पंखाखाली मग निवांत
असते..
चिंता कधी वाटत नाही
आयुष्यातलं आई नावाचा
पान...
काहीही झालं तरी कधीच
मिटत नाही..

## नशिब

जीवन हा एक प्रवास आहे
चालत राहणे कर्तव्य आहे

काय आपणास मिळेल पुढे
हा तर नशिबाचा भाग आहे

कधी आनंद तर कधी दुःख
होऊन सावलीचा खेळ आहे

आंबट गोड नात्याची इथे
एक चविष्ट भेळ आहे

आयुष्य खूप सुंदर आहे
जगता येणे महत्त्वाचा आहे

अडचणी सर्वांनाच आहेत
मात करणं महत्त्वाचं आहे

आयुष्यात नको होऊ निराश
खरंच इतकं ते कठीण नाही

हे दिवस ही बदलून जातील
स्थिर असे जगात काहीच नाही

जीव हा एक प्रवास आहे
नशीब त्याचा एक भाग आहे.





अलका बाळासाहेब तावडे, धाराशिव

# अशाने गावात सुख समृद्धी कशी नांदेल ?



उन्हाळी सुट्टीत गावाकडे गेल्यावर गावातील काही वाईट गोष्टी आणि गावाचे ओंगळवाणे रूप मनाला खटकले. गावाकडचे लोक पुर्वी प्रमाणे मायाळू, दयाळू, परोपकारी, समंजस आणि सहनशील राहिले नाहीत. शेजाऱ्यांसोबत क्षुल्लक कारणावरून भांडणे होत आहेत, रस्त्यावर जागोजागी सांडपाणी तुंबलेले आहे, शेताची वाटणी, धुऱ्याचे भांडण, वैयक्तिक टिका टिप्पणी इत्यादी कारणांमुळे गावात नेहमी भांडण तंटा सुरू आहे. गावे आता ओसाड, उजाड आणि भकास दिसू लागली आहेत. गावात सगळ्या सुख सुविधा आल्या आहेत पण गावकऱ्यांनी आदर्श जीवन परंपरा सोडून दिली आहे. सगळे काही शासनाने करावे, सगळे काही ग्रामपंचायतीने करावे आम्ही साधी काडीसुद्धा इकडची तिकडे करणार नाही अशी लोकांची धारणा बनली आहे. एक काळ असा होता की खेडेगावातील सगळे लोक एकसंघपणे गुण्यागोविंदाने नांदत होते. एकत्र येऊन सण उत्सव, महामानवांचे जयंती सोहळे आणि लेकीबाळींचे लग्न साजरा करायचे. सगळे गावकरी एकमेकांच्या सुखदुःखात सहभागी व्हायचे आणि एकमेकांच्या मदतीला धावून जायचे. पण कालांतराने गावातील काही हौशी व्यक्ती काही राजकीय पक्षांचे राजकीय कार्यकर्ते बनले आणि गावात राजकीय डावपेचांचा खेळ सुरू झाला. गावात राजकीय गटतट निर्माण झाले आणि गावातील राजकारणाने खेडेगावात अशांतता आणली. जसे राजकीय क्षेत्रात राजकारणी लोकांचे अनेक राजकीय गट निर्माण झाले तसे गावातील लोकांचे वेगळे गट निर्माण झाले आहेत. त्यामुळे गावातील सामाजिक वातावरण बिघडले आहे. लोक एकमेकांना पाण्यात पाहत आहेत. राजकारण बाजूला ठेवून गावाच्या भल्यासाठी, गावाच्या विकासासाठी सगळ्यांनी एकत्र यायचे असते हे गावकरी विसरून गेले आहेत. गावाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात निर्व्यसनी लोक फार कमी आहेत आणि व्यसनी लोकांची संख्या जास्त वाढली असल्याचे स्पष्ट दिसले. जवळपास सगळेच तरूण,प्रौढ व्यक्ती आणि वयोवृद्ध लोकसुद्धा दारुच्या नशेत झिंगताना दिसले. लहानपणापासून ज्यांना चांगले वागताना,चांगले बोलताना आणि आदर्श जीवन जगताना पाहिले होते ते लोकसुद्धा दारूच्या आहारी गेल्याचे पाहून मनाला खूप वेदना झाल्या. व्यसनी लोक निर्व्यसनी लोकांना नावे ठेवतात,वाईट लोक चांगल्या लोकांची टिंगल टवाळी करतात. यामुळे सामाजिक अशांतता डोकेदुखी वाढवत आहे. पैसेवाल्या लोकांनी इंग्रजी शाळेच्या मोहापायी आपली मुले मुली शिक्षणासाठी बाहेरगावी ठेवले आहेत त्यामुळे गावातील शाळा ओस पडत आहेत.ज्या जिल्हा परिषद शाळेने गावातील अनेक पिढ्या घडवल्या त्या शाळेची अवस्था आता बघवत नाही.शिक्षण अर्ध्यावर सोडून दिलेले तरूण व युवा मंडळ तोंडात गुटखा व हातात मोबाईल यालाच खरे सुखी जीवन समजत आहेत. हाताला मिळेल तो रोजगार दिवसभर करायचा आणि संध्याकाळी दारू पिऊन धिंगाणा घालायचा हे गावात प्रामुख्याने सुरू आहे.संध्याकाळ झाली की दारू पिणारे एकत्र येतात आणि एकमेकांना दारू पाजतात.दारू पिऊन धिंगाणा घालतात, एकमेकांना घाण घाण शिव्या हासडतात.त्यामुळे गावाचे गावपण आता हरवत चालले आहे.गावाची ही बिकट परिस्थिती पाहून 'गड्या माझा गाव बरा'असे म्हणण्याची वेळ केव्हाच निघून गेली आहे.ही दयनीय अवस्था प्रत्येक गावाची मोठी समस्या बनली आहे.हे नेहमी असेच होणार असेल तर गावात शांतता राहणार नाही,गावातील सुख समृद्धी कायमची नष्ट होईल.

बबन दामोदर गुळवे
उमरगा कोर्ट,
ता.अहमदपूर
जि.लातूर.
मो.९५४५४४२६४८.

# खाद्य जीवनशैली आणि त्याचे सामाजिक परिणाम



शहराच्या आजूबाजूला असणाऱ्या महामार्गांवर अनेक मोठमोठी हॉटेल्स दिमाखात उभी आहेत. इतकेच नव्हे, तर ग्रामीण भागातसुद्धा हॉटेल संस्कृतीचे फॅड मोठ्या प्रमाणावर रुजत आहे. हॉटेलमध्ये रोजच्या रोज पार्ट्या होत आहेत. पूर्वीच्या सात्विक सकस आहाराची जागा मसालेदार, खमंग, चविष्ट आणि परदेशी पद्धतीने बनवलेले खाद्यपदार्थांनी घेतली आहे. खाद्यसंस्कृतीतील हा बदल प्रामुख्याने आर्थिक प्रगतीची परिणीती म्हणावी लागेल. कोणत्याही छोट्याशा गोष्टीचे निमित्त करून लोक हॉटेलमध्ये जेवायला जात आहेत. एखाद्या दिवशी काहीही निमित्त नसेल, तरी लोक वर्गणी गोळा करून हॉटेलमध्ये जेवणाचा आस्वाद घेताना दिसतात. जिभेचे चोचले पुरवणे हाच एकमेव उद्देश ठेवून हॉटेलवर गर्दी झालेली दिसते. पूर्वी लोक घरी जेवत आणि बाहेर शौचास जात, आता मात्र लोक बाहेर जेवतात आणि घरी शौचास येतात. हा विनोदी बदल हॉटेल संस्कृतीच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे घडतो आहे. जागतिकीकरण, उदारीकरण, माहिती तंत्रज्ञानयुग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स या सर्व बदलांमुळे आपले सांस्कृतिक जीवन पार बदलून जात आहे. सोशल मीडियावरील रील च्या माध्यमातून महामार्गावरील हॉटेल चालक आपल्या हॉटेलची स्वतः जाहिरात करत आहेत. जेवणाच्या क्वालिटी आणि क्वांटिटीवर दंड थोपटून दावे करत आहेत.त्यांच्यातील उत्साह आणि व्यवसाय करण्याची हातोटी पाहून, या सामाजिक व सांस्कृतिक बदलांची नोंद समाज अभ्यासकांनाही घ्यावी लागत आहे.' खाऊ पिऊ , मजा करो! ' हा नवीन ट्रेंड लोकांमध्ये वाढतो आहे. आहाराच्या आहारी लोक जात असताना, एक इंग्रजी म्हण आठवते (कोणतेही जेवण फुकट नसते!) आपल्याला कोणी मेजवानी देत असेल, तर त्यामागचा हेतू तपासणे गरजेचे आहे. अनेक वेळा लोक प्रलोभन म्हणून किंवा मर्जी संपादन करण्यासाठी इतरांना जेवण घालतात. एखाद्या शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याला पंचतारांकित हॉटेलमध्ये दिले जाणारे जेवण हे फुकट नसते, तर अनधिकृत आणि अव्यवहारी असते. अर्थात, भारतीय परिप्रेक्ष्यात ही म्हण पूर्णपणे लागू होत नाही. येथे जर कोणाला पुण्य कमवायचे असेल, तर तो गोरगरिबांना जेवू घालतो. यामागचा हेतू स्वच्छ असतो. लग्न, देवकार्य आणि इतर समारंभांतून दिले जाणारे पंचपक्वान्न हे स्नेहभोजन असते. समारंभाला आलेल्या पाहुणे व मित्रमंडळींबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याचा तो एक भाग असतो. यात कोणताही स्वार्थ किंवा छुपा हेतू नसतो. परंतु काही लोक मात्र नावे ठेवत ही मेजवानी घेतात. आयुष्यभर राबून, कर्ज करून, मुलीच्या लग्नात चविष्ट भोजन देणाऱ्या वडिलांचे दुःख काहींना जाणवत नाही. अनेक जण गरजेपेक्षा अधिक वाढून घेतात आणि नंतर उष्टं टाकतात. त्यामुळे अन्नाची मोठ्या प्रमाणावर नासाडी होते.नवीन वस्तू खरेदी केल्यानंतर, वाढदिवसाच्या निमित्ताने अनेक जण इतरांना पार्टी देण्याचा आग्रह धरतात. शेवटी पैसे नसले तरी उसनवारी करून किंवा कर्ज घेऊन, हॉटेलमध्ये नेऊन आग्रह धरणाऱ्यांना जेवण द्यावं लागतं . यालाच ''फूड टॉर्चर'' म्हणता येईल.राजकीय नेते त्यांच्या कार्यकर्त्यांना आणि वरिष्ठ नेत्यांना सुग्रास भोजन देतात. कधी कधी विरोधी पक्षनेत्यांनाही जेवणाला बोलावतात. विरोध कमी करणे, मैत्री वाढवणे, किंवा सौम्य भूमिका तयार करणे या हेतूने अशा 'फूड डिप्लोमसी'चा वापर होतो. हीच डिप्लोमसी आंतरराष्ट्रीय राजकारणातसुद्धा पाहायला मिळते. त्यामुळेच, ''कोणतेही जेवण फुकट नसते'' ही म्हण विसरता कामा नये.शेवटी, कोणी जर तुम्हाला ''चल, तुला चांगलं जेवण चारतो'' असं म्हणालं, तर त्याचा हेतू तपासून पाहावा. कोणालाही जेवण देण्याचा अति आग्रह करणे म्हणजे असंस्कृतपणाचं लक्षण आहे. कोणतेही जेवण फुकट नसते, याचे भान समाजाने राखले पाहिजे.




किशोर जाधव
सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

# ग्रामीण भागातील आदर्श शाळा



गाधी विद्यालय, चिखली. लोकांचे ग्रामदैवत सिद्धेश्वराचे सोळाव्या शतकातील प्राचीन मदीर असून ब्रम्हचारी शिवगुरु महाराजांची समाधी आहे. ग्रामदैवतावरील श्रध्दा, निष्ठेतूनच चिखली गावची सकाळ होते. काबाडकष्ट करणारे लोक शेतीवर अवलंबून आहेत. सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने नादतात.गावामध्ये इ. ७वी पर्यंत शाळा आहे. पण ७वी नतर गावात शिक्षणाची सोय नव्हती. मुलींना तर शाळा सोडावी लागत असे. शिक्षणाचे अल्प प्रमाण होते. ही बाब श्री शाहूराज चोबे यांच्या लक्षात आली. त्यांनी १९८६ मध्ये म. गाधी शिक्षण संस्था, स्थापना केली. व इ. स. १९८९ मध्ये गाधी विद्यालय, चिखली ही शाळा सुरू झाली. इ. ८वी चा वर्ग सुरू झाला. गावात, पालकांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अल्पावधीतच शाळेने मोठी झेप घेतली. शाळेने वेगवेगळे उपक्रम राबविण्यात आले. रात्र अभ्यासिका, जादा तास, शिष्यवृत्ती, खेळ आदी उपक्रम राबविले. जेणेकरून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास सुरुवात झाली. शाळेच्या निकालाचा आलेख वाढतच गेला.बहुजनांच्या मुलांना/ मुलींना सकस शिक्षण मिळू लागले. पचक्रोशीतील मुले/ मुली मोठ्या प्रमाणात प्रवेश घेवू लागली... १०वी १२ वी नतर मुले/ मुली शहरात शिकु लागली. स्पर्धा परीक्षांची तयारी करू लागली... क्रीडाविभाग.... मुळतः च चिखली गावाला कब्बडी खेळाची आवड होती पूर्वी इथे दोन क्रीडामडळे होती. अनेक खेळाडू या क्रीडामडळाने दिले. या मातीत खेळाचे बीज रुजले आहे. हीच बाब लक्षात घेवून शाळेत खो खो खेळाची सुरुवात केली. शाळेचे क्रीडा शिक्षक रमेश बागर, स. क्रीडाशिक्षक दिलीप चव्हाण या जोडीने मोठी अशी लाल मातीची मैदान तयार करुन दिवस रात्र थोडा सराव सुरू झाला. शालेय स्तरावर दोन संघ नेहमी तयार असत. तालुका, जिल्हा, विभाग, राज्य असा चढता आलेख सुरु झाला. नेहमी विजय खेचून आणला जात असे. आज शाळेने २०० राज्य खेळाडू,तर १७० राष्ट्रीय खेळाडू निर्माण केले. त्यामुळे ५ / टक्के राखीव जागेतून ७० पोलीस ८ फौजदार म्हणून नोकरीस लागले. तसेच विशेष बाब म्हणजे बिगर खेळाडू सुद्धा अनेक ठिकाणी नोकरी स लागले आहेत. म्हणून चिखलीला पोलीसांचे किंवा नोकरदारांचे गाव म्हणून ओळखले जाते. .. केवळ पोलीसच नव्हेतर मत्रालय लिपीक १० महसूल सहाय्यक ४ इजिनिअर ४१ डॉक्टर.. १० पोलीस ७० फौजदार ०८ क्लासवन.. ०२ क्लास टू... ०६ शिक्षक ०५ फॉरेस्ट... ०४ आर्मी.. १८ आरोग्य नर्स ... ०४ तलाठी... ०४ इतर.. १० वरील सख्या सर्वेक्षण करून घेतली आहे. कमी जास्त होवू शकते. ग्रामीण भागातील एका शाळेने मेहनत घेवून स्पर्धेत विद्यार्थ्यांना उतरावले आहे. केवळ क्रीडा क्षेत्रात विकास नाही.इथे विद्यार्थ्याचा सामाजिक, बौद्धिक, शारीरिक, शैक्षणिक विकास साधला जातो. याचे सारे श्रेय इथल्या कर्मचारी, सस्थाचालक, पालक, विद्यार्थी यांनाच द्यावे लागेल. ग्रामीण भागात अधिकच नावलौकीक वाढत असतानाच पचक्रोशीतील राजुरी, महाळगी बोरगाव (राजे), मेढा या गावातून मुले/मुली शिक्षणासाठी येतात. काही वर्षापूर्वी शाळेचा प्रवेश बद करण्यात आला होता. शाळेचे सकल्पक, सस्थापक अध्यक्ष कै. शाहूराज चोबे यांचे एक स्वप्न होते. शेतकरी, शेतमजूर, बहुजनांची मुले शिकली पाहिजेत, पूर्ण झालेले स्वप्न पाहाण्यासाठी दादा ( शाहूराज चोबे) आज नाहीत. चिखली गावची शिक्षणामुळे खूप मोठी प्रगती झाली आहे. धाराशिव औसा रस्त्यावर चौकात मोठी बाजारपेठ उभी झाली आहे. रोज लाखो रुपयांची उलाढाल होते. सर्व तरुण उद्योजक गाधी विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक विकास केवळ शिक्षणामुळेच होतो. हे सिद्ध करून दाखवले आहे. आज प्रत्येक पालक स्वतः शिक्षणासाठी लक्ष घालित आहे. शिक्षणाशिवाय पर्याय नाही. म्हणून गाधीजी नेहमी म्हणत खेड्याचा विकास झालातरच देशाचा विकास होईल. चिखली हे शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक बाबीसंबंधी खेड्यांसमोर आवाहनत्मक मॉडेल आहे. बाजारपेठ, शाळेस भेट द्या. इथला तरुण दिशाहीन नाही. मेहनत, जिद्द, चिकाटी, ध्येय यावर त्याचा अथक विश्वास आहे. म्हणून दिशाहीन तरुणांनी काहीतरी सदेश घेतला पाहिजे.शेवटी लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा जि. गडचिरोली येथे पद्मश्री श्रदेय डॉ. प्रकाश आमटे दरवर्षी मे महिन्यात श्रम संस्कार शिबीर घेतात. देशाच्या कानाकोपऱ्यातून तरुण/ तरुणी येतात. खूप शिकून जातात. मेहनती शिवाय पर्याय नाही. तोच आदर्श इथल्या तरुणांनी घेतला आहे. म्हणून नोकरदार, उद्योजक मोठ्या प्रमाणात आहेत.



सुभाष चव्हाण
(सेवानिवृत्त मुख्याध्यापक)
गाधी विद्यालय, चिखली.
ता. जि. धाराशिव
मो.क्र.९६०४७४१५०९

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# श्रेयवादी गेले कुठे..? १० कोटी खर्च केलेल्या बसस्थानकाची दुर्दशा










छायाचित्र: मुकेश नायगावकर,धाराशिव

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव आणि तुळजापूर बसस्थानकाचे नूतनीकरण करण्यात आले असून, धाराशिव बसस्थानकासाठी १० तर तुळजापूर बसस्थानकासाठी ८ कोटींचा निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र, दोन्ही बसस्थानकात पूर्वीपेक्षा जास्त समस्या निर्माण झाल्या आहेत. धाराशिव बसस्थानकाच्या एका बाजूला फ्लोअरिंगचे काम सुरू आहे तर दुसऱ्या बाजूला जिथे बस थांबतात,तिथे चिखलाने दुर्दशा दाखवून दिली आहे.

## चौकशी निष्पक्षपणे व्हावी

दैनिक आरंभ मराठीने दोन्ही बसस्थानकाच्या कामातील त्रुटी आणि उणिवा समोर आणल्या आहेत. या बातम्यांची दखल घेऊन पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी कामांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र, ही चौकशी निष्पक्षपणे व्हावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## तीनवेळा उद्घाटन, अपयशाचे श्रेय कोण घेणार ?

धाराशिव बसस्थानकाच्या कामांचे तब्बल तीन वेळा वेगवेगळ्या पालकमंत्र्यांकडून उद्घाटन करण्यात आले होते. प्रत्यक्ष काम पूर्ण होण्यासाठी ७ वर्षांचा कालावधी गेला. काम अपूर्ण असतानाच परिवहन मंत्री तथा पालकमंत्र्यांच्या हस्ते बसस्थानकाचे उद्घाटन करण्यात आले.मात्र आधी उन्हाळ्यात आणि आता पावसाने महामंडळाची बोगसगिरी आणि श्रेय घेणाऱ्यांचा खरा चेहरा समोर आणला आहे.चिखलाने बरबटलेल्या बसस्थानकात प्रवाशांना पाऊल ठेवणेही कठीण होऊन बसले आहे.मात्र या अपयशाचे, बोगसगिरीचे श्रेय घेण्यासाठी पुढे कोण येणार,याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# संकल्प ते सिद्धी अंतर्गत भाजपचा उद्या जनता दरबार

आरंभ मराठी | धाराशिव

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीच्या निमित्ताने भारतीय जनता पक्षातर्फे 'संकल्प ते सिद्धी' अभियानांतर्गत रविवार, १५ जून रोजी जिल्ह्यात विविध ठिकाणी 'जनता दरबार'चे आयोजन करण्यात आले आहे. माजी आमदार सुजितसिंह ठाकूर यांच्या मार्गदर्शनाने आणि आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्त्वात साकार होणाऱ्या या उपक्रमातून नागरिकांच्या अडचणी आणि तक्रारी थेट ऐकून शासकीय यंत्रणा आणि पक्ष पातळीवर त्यांचे निराकरण करण्याचा भाजपचा मानस आहे. जिल्ह्यातील तुळजापूर, धाराशिव आणि कळंब तालुक्यांमध्ये सहा गटांमध्ये हे जनता दरबार आयोजित केले जाणार



असून, गावागावातील नागरिकांना आपल्या समस्या मांडण्याची संधी मिळणार आहे. भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी नागरिकांना या दरबारात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. रविवारी सकाळी १० वाजता जनता दरबाराला सुरुवात होणार आहे. कळंब तालुक्यातील ईटकुर येथे भाजप नेते नेताजी पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि अरुण चौधरी यांच्या



अध्यक्षतेखाली दरबार होईल. शिराढोण येथे जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मिता कांबळे यांच्या उपस्थितीत आणि दत्ता साळुंखे यांच्या संयोजनाखाली कार्यक्रम पार पडेल. धाराशिव तालुक्यातील ढोकी येथे माजी जि.प. सभापती ॲड. दत्तात्रय देऊळकर यांच्या उपस्थितीत आणि अनिल भुतेकर यांच्या अध्यक्षतेखाली दरबार आयोजित होईल. कोंड येथे ॲड. नितीन काळे यांच्या उपस्थितीत आणि नीलकंठ पाटील यांच्या संयोजनाखाली जनता दरबार होणार आहे. तुळजापूर तालुक्यातील काटगाव येथे ॲड. खंडेराव चौरे यांच्या उपस्थितीत आणि म हादेव जाधव यांच्या संयोजनाखाली कार्यक्रम होईल, तर नांदगाव येथे दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या उपस्थितीत आणि रंजना राठोड यांच्या अध्यक्षतेखाली दरबार पार पडेल.'संकल्प ते सिद्धी' अभियानातून शासन आणि जनता यांच्यात थेट संवाद साधण्यासाठी भाजपचे नेते आणि कार्यकर्ते गावागावात पोहोचत आहेत.

# शिवसेना शहर प्रमुखपदी आकाश कोकाटे यांची निवड

आरंभ मराठी | धाराशिव

शिवसेना (बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या धाराशिव शहर प्रमुखपदी आकाश मि लींदराव कोकाटे यांची निवड करण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही निवड महत्त्वाची म ानली जात आहे. शिवसेनेचे पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार व पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या मान्यतेनेशिवसेनेचे सचिव संजय मोरे यांनी ही निवड केली आहे. पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते निवडीचे पत्र आकाश कोकाटे यांना देण्यात आले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार या पदाच्या माध्यमातून करावा, तसेच पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी कार्य करावे असे नियुक्तीपत्रात म्हटले आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, शिवसेना पदाधिकारी



व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.आकाश कोकाटे यांनी धाराशिव शहर आणि परिसरात शिवसेना पक्ष वाढीसाठी मोठे प्रयत्न केले आहेत. शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्यासोबत काम करत असताना त्यांनी कार्यकर्त्यांची मोट बांधून पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला बळकटी देण्याचे काम सतत करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे. या निवडीचे तमाम शिवसैनिकांमधून स्वागत होत आहे.

# विना कागदपत्र व विना परवाना ऑटोरिक्षांवर कारवाई करण्यासाठी शिवराज्याभिषेक रिक्षा समितीचे निवेदन

आरंभ मराठी | धाराशिव

शिवराज्याभिषेक रिक्षा समिती धाराशिवच्या वतीने धाराशिव शहरातील सर्व परवानाधारक ऑटो रिक्षा चालक–मालकांनी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय धाराशिव तसेच पोलीस वाहतूक नियंत्रण शाखा धाराशिव यांना विना कागदपत्र व विना परवाना रिक्षांवर कारवाई करण्याच्या मागणीचे निवेदन दिले. धाराशिव शहरामध्ये हजारोंच्या संख्येने विना कागदपत्र, स्क्रॅप, विनापरवाना ऑटो रिक्षा बेकायदेशीरपणे प्रवासी वाहतूक व्यवसाय करत आहेत. वाहतुकी संबंधित दोन्हीही कार्यालयास वारंवार निवेदन देऊन सुद्धा अशा विना कागदपत्र, स्क्रॅप, विनापरवाना ऑटो रिक्षावर कारवाई करत नाहीत. यामुळे परवानाधारक, टॅक्स भरणारे ऑटो रिक्षा चालक मालकांवर फार मोठा अन्याय होत आहे. विना कागदपत्र



विनापरवाना स्क्रॅप ऑटोरिक्षा मुळे परवानाधारक ऑटो रिक्षा चालक चालकांच्या व्यवसायावर गंभीर परिणाम होत आहे. तरी संबंधित दोन्ही विभागांनी लवकरात लवकर कठोरात कठोर कारवाई न केल्यास सर्व परवानाधारक ऑटो रिक्षा चालक–मालक यांच्यावतीने उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. तसेच याची सर्वस्वी जबाबदारी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व वाहतूक नियंत्रण शाखा यांची राहील असे निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे. यावेळी रिक्षा समितीचे अध्यक्ष वेंकटेश पडिले, उपाध्यक्ष तुषाल सूर्यवंशी, सचिव कलिम शेख, कार्याध्यक्ष योगेश अतकरे, संतोष घोरपडे, आमेर मशायक, हुसेन सय्यद, राम कांबळे, अविनाश खानापुरे, दिलीप राठोड,सुहास थोरात,गोविंद शिंदे, रोहित गवंडी, गणेश राठोड,देवा आडे,अजय भगत, अविनाश पवार, बजरंग पवार,गणेश मडके, बाजीराव ढवाण,विशाल कतारी, पांडुरंग महाडिक, इस्माईल शेख,अनिल मुळे,नवेश खैरे,नागेश चव्हाण, श्रीकांत कट्टी, श्रीकांत राठोड, लहू पवार, कृष्णा माणकेश्वरी,आबा यादव, संतोष हावळे, विश्वंभर आगळे, संजय गायकवाड, सुहास सोनकांबळे, मधुकर अवताडे, खंडू घोगरे, अजय डोंगरे, युवराज काळे, यासह शेकडो ऑटोरिक्षा चालक–मालक उपस्थित होते.

# कॅम्पस मुलाखतीत शिवाई इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथील ३२ विद्यार्थ्यांची निवड



आरंभ मराठी | उमरगा

उमरगा तालुक्यातील कोरेगाववाडी येथील शिवाई चॅरिटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी येथे बी. फार्मसी व डी. फार्मसी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांकरिता दिनांक ११ जून रोजी कॅम्पस मुलाखत आयोजित करण्यात आली होती. यावेळी टेककेअर मेडिकल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, शाखा पुणे व मुंबई येथील संग्रामसिंह पवार, कमल कुमार यांनी म ुलाखती घेतल्या. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बी.एच. बेडदुर्गे, सचिव विजय बेडदुर्गे व उपाध्यक्ष अजय बेडदुर्गे यांची उपस्थिती होती. यावेळी कमल कुमार व संग्राम सिंह यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन यामध्ये महाविद्यालयातील ३२ विद्यार्थ्यांची पुणे व मुंबई शाखेसाठी निवड केली. तसेच त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी जाताना कशी तयारी करावी याबद्दल मार्गदर्शन केले. यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष बी.एच.बेडदुर्गे, सचिव डॉ.विजय बेडदुर्गे यांनी शुभेच्छा दिल्या. प्लेसमेंट सेल ऑफिसर श्रीकृष्ण मुळे, अशोक गायकवाड यांनी मेहनत घेतली. यावेळी प्राचार्य महेश कदारे, डॉ.अश्विनी सुर्यवंशी, परीक्षित शिरूरे, किरण पांचाळ, फुलचंद काजळे, धनश्री भुजंगे, अंकिता यादव, शितल शेळके, मंजुषा गव्हाळे व विद्यार्थी उपस्थित होते. धनश्री भुजंगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले व आभार मानले.

www.arambhmarathi.com
दैनिक आरंभ मराठी
आपलं धाराशिव.
शनिवार दि.14 जून 2025

# मद्यपान करणाऱ्या शिक्षकाची बदली करा, अन्यथा १७ जूनला भरवणार गटशिक्षणाधिकारी कार्यालयामध्ये शाळा

## डोकेवाडी ग्रामस्थांचा शिक्षकाविरुद्ध आक्रमक पवित्रा

आरंभ मराठी | भूम

**भूम तालुक्यातील डोकेवाडी येथे जि. प. शाळेचे पदवीधर शिक्षक धनराज हात्तुरे हे गेल्या शैक्षणिक वर्षापासून शाळेवर गैरहजर असून ते मद्यपान करून शाळेवर येत असल्याचे शालेय व्यवस्थापन समितीने गट शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार दिल्याने शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे. सदर शिक्षकावर कारवाई करावी व इतरत्र बदली ची मागणी ग्रामस्थांच्या वतीने होत आहे.**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोकेवाडी येथील पदवीधर शिक्षक धनराज परमेश्वर हत्तुरे हे शाळेला सतत गैरहजर राहतात व व्यसन करून येतात असा आरोप शालेय व्यवस्थापण समिती अध्यक्ष हरिदास आहेर यांनी लेखी निवेदनाद्वारे गट शिक्षणाधिकारी कार्यालयाला कळविण्यात आले आहे. धनराज हत्तुरे हे मागील शैक्षणिक वर्षांमध्ये फक्त १२६ दिवस शाळेला उपस्थित राहिले असून १०८ दिवस शाळेला गैरहजर राहिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. शिक्षक शाळेला गैरहजर राहत असुन मद्यपान करून शाळेवर येत असल्याचा आरोप शालेय व्यवस्थापन समितीने केला आहे. शिक्षकामुळे शाळेतील विद्यार्थी संख्या घटली आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकांची तात्काळ बदली करावी अन्यथा आम्ही गटशिक्षणाधिकारी कार्यालय भूम येथे मंगळवारी दि.१७ जुन रोजी शाळेतील सर्व विद्यार्थी यांना घेऊन येऊ व त्या ठिकाणी शाळा भरवू असा इशारा देण्यात आला आहे. सदर शिक्षकाच्या तक्रारी गेल्या वर्षभर ग्रामस्थांनी वेगवेगळ्या प्रकारे गटशिक्षण अधिकारी कार्यालय भूम यांच्याकडे दाखल केल्या होत्या. तरी देखील सदर शिक्षकाला साधी नोटीस देखील देण्यात आली नव्हती. त्यामुळे शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामस्थांनी पुढील शैक्षणिक वर्षात तरी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने लेखी तक्रार देण्यात आली आहे. गटशिक्षण अधिकारी कार्यालयास निवेदन प्राप्त होताच झोपी गेलेले शिक्षण विभाग जागे झाले आणि विस्तार अधिकारी अनिता जगदाळे यांनी शाळेला भेट दिली. त्यांनी ते शिक्षक दिनांक १६ जून रोजी शाळेला उपस्थित राहणार नाही असे लेखी आश्वासन दिले आहे. शाळेला उपस्थित राहणार नाही पण बदली च काय असा सवाल ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित केला जात आहे.

### शिक्षक १०८ दिवस गैरहजर हजर, १२६ दिवस हजर

शाळेतील शिक्षक धनराज हत्तुरे हे मागील वर्षातील केवळ १२६ दिवस शाळेला उपस्थित होते. ते १०८ दिवस शाळेला अनुपस्थित होते. वेळीवेळी आम्ही गटशिक्षणाधिकारी कार्यालयास यांच्या गैरहजेरीचा अहवाल दिला आहे. विद्यार्थीच्या परीक्षा ही ऐआम्ही घेतल्या पेपर ही आम्ही तपासणी केली.

–अभिमन्यू निकम
मुख्याध्यापक,जि.प.शाळा
डोकेवाडी ता.भूम

### लेखी तक्रार नसल्यामुळे कारवाई केली नाही

डोकेवाडी गावातील लोक फक्त फोन वर तक्रार करतात. आमच्याकडे लेखी तक्रार प्राप्त न झाल्यामुळे आम्ही कसल्याच प्रकारे कारवाई करू शकत नाही. आता लेखी तक्रार मिळाली आहे. संबंधित शिक्षकांची बदलीसाठी सहा–सात महिने लागतील. आम्ही आमचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवून देणार आहोत.

राहुल भट्टी
गटशिक्षणाधिकारी, भूम

### पंचायत समितीचा अहवाल येताच कारवाई करू

विस्तार अधिकारी यांचा लेखी अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधित शिक्षकावर योग्य कार्यवाही करण्यात येई

अशोक पाटील
शिक्षणाधिकारी (प्रा)

# प्रा. सोमनाथ लांडगे यांना अहिल्यादेवी होळकर कार्य गौरव पुरस्कार प्रदान



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव येथील शैक्षणिक व सामाजिक चळवळीत सक्रिय असलेले श्री साई श्रध्दा एज्युकेशन नीट ऑनलाईन टेस्ट सीरिजचे संचालक तसेच बील गेट्स जुनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रा. सोमनाथ लांडगे यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राज्यस्तरीय कार्य गौरव पुरस्कार प्रदान नुकताच करण्यात आला.अमरावती येथील अंबाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने प्रा. सोमनाथ लांडगे यांच्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला. दि. ११ जून २०२५ रोजी क्षितिज पॅलेस, स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज चौक, अमरावती येथे समारंभ पुर्वक मोठ्या दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातील जनसंपर्क अधिकारी डॉ. मनिष गवई व कमलताई गवई यांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. याच कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करून मार्गदर्शन करण्यात आले. यावेळेस वेगवेगळ्या शैक्षणिक विषयावर मान्यवरांचे मार्गदर्शन झाले. प्रा. सोमनाथ लांडगे यांनी सत्काराला उत्तर देत ''मुलांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीत पालकांचे योगदान '' या विषयावर आपले सविस्तर विचार मांडले. सध्याच्या परिस्थितीत आईवडील जर मुलांच्या शिक्षणातील बारीक सारीक बाबी समजून घेऊन त्यांना सर्व बाजूंनी सोबत राहत मदत करत असतील तर मुले नक्कीच यशस्वी होतील, असे सांगीतले. या कार्यक्रमात सर्वोच्च न्यायालयाचे मुख्यन्यामुर्ती भुषण गवई यांच्या आई कमलताई गवई, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयातील जनसंपर्क अधिकारी डॉ. मनिष गवई, राष्टवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष प्रशांत डावरे,साहित्यिक विष्णुसिंह सोळंकी, प्राचार्य डॉ. दिलीप काळे, अंबाई बहुउद्देशीय संस्थेच्या सचिव माधुरी चव्हाण या मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमास या मान्यवरांसह विद्यार्थी, शिक्षक, पालकांसह अनेक जण उपस्थित होते. यापूर्वी याच वर्षात पुणे येथे राज्यस्तरीय कृतिशील शिक्षक पुरस्कार प्रा. सोमनाथ लांडगे यांना मिळला असून हा दुसरा राज्यस्तरीय पुरस्कार आहे.शैक्षणिक क्षेत्रात सतत नवनवीन प्रयोग करून मेडिकल कॉलेज प्रवेश पुर्व परिक्षा अर्थात नीट परीक्षेत आपला नवीन पॅटर्न तयार करून अनेक गोरगरीब व वंचित मुला–मुलींना वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्यात यशस्वी झालेले व धाराशिव शहरात श्री साई श्रध्दा एज्युकेशन मार्फत अत्यंत कमी फीस मध्ये मुलींचे वसतीगृह, अर्थिक अडचणीत असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या मुलींना शैक्षणिक फीस भरण्यास मदत असे अनेक शैक्षणिक करत असलेल्या प्रा. सोमनाथ लांडगे यांना हा पुरस्कार प्रदान केल्याबद्दल अनेक मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# ईट येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराला प्रतिसाद; मात्र प्रशासकीय नियोजनाचा अभाव

## पूर्वी दाखल झालेल्या प्रकरणांच्या प्रमाणपत्राचेच शिबिरात वाटप

## योग्य नियोजनाअभावी लाभार्थ्यांना रिकाम्या हाताने परतावे लागले

आरंभ मराठी | भूम

**महसूल विभाग ईट मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये शेकडो लाभार्थ्यांनी गर्दी केली होती. शिबिरामध्ये लाभधारकांच्या अडचणीचा निपटारा होणे गरजेचे होते. परंतु कागदाची जुळवाजुळव करण्यात लाभार्थ्यांचा वेळ वाया गेला आणि अनेकांच्या अडचणी न सोडवता अधिकारी तालुक्याला परतले तर लाभधारक घरी परतले.**

ईट येथे झालेल्या महसूल विभागाच्या शिबिरामध्ये उपविभागीय अधिकारी वैशाली पाटील, तहसीलदार जयवंत पाटील, नायब तहसीलदार प्रवीण जाधव यांच्यासह महसूल चे कर्मचारी उपस्थित होते. शिबिरामध्ये उपस्थित नागरिकांना विविध प्रमाणपत्र वाटप करणे, संजय गांधी योजनेच्या लाभार्थींना डीबीटी नोंदणी, आधार दुरुस्ती, शिधापत्रिका दुरुस्ती आदी प्रमाणपत्रे देण्याच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. परंतु, लाभार्थ्यांना विविध कागदपत्राची कारणे देत परत पाठवण्यात आले. निराधारांच्या वेतनाच्या मोठ्या प्रमाणावर विविध कारणाने निधी थांबविला असल्याने निराधारांची या ठिकाणी गर्दी झाली होती. परंतु त्यांच्या अडचणी प्रत्यक्षात सोडवल्या गेल्या नाहीत. वेगवेगळी कारणे देत त्यांना परत पाठवले गेले.ईट मंडळातील नागरिकांनी पूर्वीच सेतू सुविधा केंद्रामध्ये प्रस्ताव दाखल दाखल करत विविध प्रमाणपत्राची मागणी ऑनलाइन अर्ज दाखल करून केली होती. मागील झालेल्या चार–पाच दिवसांमध्ये दाखल केलेल्या अर्जाचे प्रमाणपत्र या ठिकाणी देण्यात आले. खऱ्या अर्थाने ते प्रमाणपत्र त्या लाभार्थ्यांनी सेतू सुविधा केंद्रावर दाखल करून त्याच ठिकाणी मिळणार होते. शिबिरामध्ये दाखल होणाऱ्या प्रमाणपत्राबाबत मात्र शून्य कारवाई करण्यात आली. सर्व प्रमाणपत्राचा मिळून ५४६ आकडा शिबिरात सांगण्यात आला. परंतु यातील अनेक प्रकरणे पूर्वीच सेतू सुविधा केंद्रात दाखल झालेले होते. ईट येथे महसूल मंडळाचे शिबिर असल्याने मंडळातील प्रमाणपत्रे तातडीने तयार करण्यात आले व शिबिरामध्ये देण्याचा प्रकार घडला. तहसीलदार यांनी जाहीर केलेल्या परिपत्रकामध्ये सकाळी नऊ वाजता कर्मचाऱ्यांनी हजर राहण्यास सांगितले असताना देखील साडेदहा वाजेपर्यंत कर्मचारी हजर नव्हते. शिबिराच्या ठिकाणी आवश्यक लागणारी नमुना कागदपत्रे ठेवावीत असे फर्मान असताना देखील सदरचे नमुना कागदपत्रे या ठिकाणी उपलब्ध नसल्याने लाभधारकांना चांगलीच धावपळ करावी लागली. सिद्धेश्वर मंदिर येथे आयोजित शिबिरामध्ये ईट, पखरूड, माळेवाडी, ज्योतिबाची वाडी, निपाणी, लांजेश्वर, गिरवली, सोनेवाडी, अंजनसोंडा, डोकेवाडी, पांढरेवाडी, घाटनांदुर, चांदवड, भवानवाडी या गावाचा समावेश होता. सदर गावातील शेकडो नागरिक, जेष्ठ नागरिक, महिलांनी गर्दी केली होती. सदर शिबिरासाठी २७ कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. अनेक प्रकरणाच्या कागदपत्राचे गट्टे बांधून तहसील कार्यालयात नेण्यात आले. सरकार आपल्या गावात येत असल्याने शिबिरामध्ये आपले काम होईल असे नागरिकांना वाटत होते. परंतु निराश होऊन नागरिकांना परत आपल्या गावी जागी जावे लागले.

# शिवसेना (उबाठा) पक्षाच्या कळंब तालुका समन्वयकपदी आकाश पवार यांची नियुक्ती

## तालुक्यातील शिवसैनिकांनी केले निवडीचे स्वागत

आरंभ मराठी | मुरुड

कळंब तालुक्यातील वाठवडा ग्रामपंचायतचे सदस्य तथा खासदार ओमराजे व आमदार कैलास पाटील यांचे विश्वासू सहकारी आकाश पवार यांची शिवसेना पक्षाच्या कळंब तालुका समन्वयक पदी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल तालुक्यातील सर्व शिवसैनिकांनी त्यांचे स्वागत केले. गेल्या अनेक वर्षापासून शिवसेना ठाकरे गटाशी एकनिष्ठ राहिलेले आकाश पवार यांनी ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये स्वतंत्र पॅनल उभा करून आपल्या पॅनलचा उपसरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य निवडून आणले. त्याचबरोबर नाम फाउंडेशन, पाणी फाउंडेशन च्या माध्यमातून वाटवडा या गावाभोवती पाण्याचा साठा मोठ्या प्रमाणात व्हावा या हेतूने झोकुण देऊन कार्य केले. खासदार ओमराजे तसेच आमदार कैलास पाटील यांच्यामार्फत गावातील रस्ते, शाळांच्या खोल्या, दलित वस्तीला निधी, गावातील सभागृह अशा अनेक कामासाठी गावामध्ये मोठ्या प्रमाणात निधी आणल्याने त्यांच्या या कार्याची दखल घेऊन ओमराजे व कैलास पाटील यांनी पक्षाकडे शिफारस करून त्यांची नियुक्ती कळंब तालुका समन्वयक पदी करण्यात आली.

### शिवसैनिका सोबत समन्वय ठेवून काम करणार



पक्षाने दाखवलेला विश्वास तसेच पक्षश्रेष्ठींनी सोपवलेली जबाबदारी सार्थ ठरवण्यासाठी अहोरात्र काम करून कळंब तालुक्यातील सर्व शिवसैनिकांमध्ये समन्वय ठेवून पक्ष कार्य वाढवणार. येणाऱ्या काळात शिवसेनेने केलेली कार्य तसेच धाराशिव जिल्ह्याचे खासदार व आमदार यांचे कार्य गावागावात पोहोचवणार. न दरबारी मांडून त्या सोडवून घेणार.

–आकाश पवार

# कुरनूरच्या दुरूस्तीचे काम युद्धपातळीवर

## दुरूस्तीच्या कामाची आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडून पाहणी





आरंभ मराठी | धाराशिव

तुळजापूर तालुक्यातील कुरनूर मध्यम प्रकल्पातील पाणी वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी आहे. दुरूस्तीअभावी अनेक ठिकाणी कालव्याला गळती लागली होती. त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाण्याचे वितरण होत नव्हते. परिणामी ३,५०० हेक्टर क्षेत्राला त्याचा फटका सहन करावा लागत होता. वितरण व्यवस्थेत सुधारणा, अस्तरीकरण आणि बांधकाम दुरूस्तीसाठी हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारकडून आपण मिळवून घेतलेल्या २९ कोटी ६५ लाख रुपयांच्या निधीतून दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. कामाची पाहणी करून जलसंपदाच्या अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचना दिल्या असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. या कामामुळे १० गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्राला लाभ होणार आहे. कुरनूर मध्यम प्रकल्पाचा मुख्य कालवा आणि वितरिकेमार्फत प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील नळदुर्ग, अणदूर, चिवरी, गुजनूर, खुदावाडी, सराटी, शहापूर, वागदरी आणि बाभळगाव आदी दहा गावांना शेतीसाठी कालव्याद्वारे पाणी दिले जाते. दहा गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्र या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र प्रकल्पाची वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी होती. आजवर झालेला वापर, कालव्याची वेळेवर न झालेली दुरूस्ती, अशा अनेक कारणांमुळे पाण्याचा विसर्ग ५० टक्क्यांवर आला होता. कालवा भरावातून, बांधकामातून अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाण्याला गळती लागली आहे. त्यामुळे कालव्याच्या शेवटच्या भागात असलेल्या शेतकऱ्यापर्यंत उपलब्ध असलेले पाणी पोहोचण्यास मोठी अडचण निर्माण झाली होती. सिंचन अवर्तनाचा कालावधीही वाढल्याने सिंचन क्षेत्रात मोठी घट झाली असल्याचे निदर्शनास आले होते. अनेक ठिकाणी शेवटच्या टोकाला कालवा बुजविला गेल्याचे स्थानिक शेतकरी बांधवांनी निदर्शनास आणून दिले होते.मागील ५५ वर्षांत या कालव्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे परिसरातील गावांना तोटा सहन करावा लागत आहे. अनेक शेतकरी बांधवांनी उपोषण केले. अनेकांनी आत्मदहनाचे पत्र दिले. रब्बी आणि उन्हाळी हंगामात कालव्याच्या नादुरूस्तीमुळे अनेकांच्या पिकाला पाणी मिळू शकले नाही. त्यामुळे या प्रकल्पातून पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली घट दूर होवून सिंचन क्षेत्र वाढावे, याकरिता वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरण आणि त्यावरील बांधकाम दुरूस्तीसाठी महायुती सरकारकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी त्यासाठी तब्बल २९ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे कालव्याच्या लाभ क्षेत्रातील वरील १० गावांमधील शेकडो शेतकरी बांधवांची मागणी महायुती सरकारमुळे पूर्ण झाली आहे.अस्तरीकरण आणि बांधकामाच्या कामाची निविदा ७ ऑक्टोबर रोजी जाहीर झाली. मागील ५० वर्षांपासून दुरूस्तीअभावी रखडलेल्या कुरनूर मध्यम प्रकल्पाच्या दुरुस्तीचे काम आता युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे या क्षेत्रातील शेतकऱ्यांना पुन्हा त्यांच्या हक्काचे पाणी लवकरच मिळणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

# शिक्षकांनो, शिक्षण क्षेत्रात येणाऱ्या बदलास सकारात्मकतेने सामोरे जा

## शिक्षणाधिकारी सुधा साळुंके यांचे प्रतिपादन



आरंभ मराठी | उमरगा

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार येऊ घातलेल्या बदलास आपण सकारात्मकतेने सामोरे जाऊन अपेक्षित उद्दिष्ट्ये साध्य करू शकतो असे प्रतिपादन जिल्हा शिक्षणाधिकारी सुधा साळुंके यांनी तालुकास्तरीय आढावा बैठकीत केले. उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात आयोजित तालुकास्तरीय शाळापूर्व तयारी आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. विद्यार्थी प्रवेश, शाळा प्रवेशोत्सव, आधार नोंदणी, आपार नोंदणी, स्काफ, संच मान्यता, समायोजन, अकरावी ऑनलाईन प्रवेश, सर्व विद्यार्थी लाभाच्या योजना, सर्व शिष्यवृत्ती योजना, वृक्ष लागवड, युडायस आदी मुद्द्यांवर या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. यावर्षी ही बैठक तालुकास्तरावर घेण्यात आली. यावेळी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी सुधा साळुंके, उपशिक्षण अधिकारी लांडगे, उपशिक्षणाधिकारी (योजना) माळी, शिक्षण विस्तार अधिकारी भारत देवगुडे, शिक्षण विस्तार अधिकारी यरमुनवाड, विशिष्ट विस्तार अधिकारी मुलगे, गट शिक्षणाधिकारी राजपूत आदी उपस्थित होते. उमरगा व लोहारा तालुक्यातील विविध शाळा, कनिष्ठ महाविद्यालयाचे मिळून जवळपास दीडशे प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित होते. यामध्ये सर्वच बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी लांडगे आणि इतर मान्यवरांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षण विस्तार अधिकारी यरमुनवाड यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. गुंडाजी बापू मोरे, भारत विद्यालयाचे मुख्याध्यापक शाहूराज जाधव, कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले व प्रा. एस. बी. सूर्यवंशी आदींनी कष्ट घेतले.